05-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/04/2025 10:59 PM Page 1

निवडक

मुळगाव येथे गिरनार वारी भक्तांतर्फे ७ पासून विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड



साळ, दि. ४ : गिरनार वारी भक्तांतर्फे शुक्रवार दि. ७ ते रविवार दि. ९ दरम्यान मुळगाव येथील मोहिनी हॉल बागवाडो येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ७ रोजी सकाळी ९ वाजता यजमान उमेश गावकर व उदय प्रभू आणि गिरनार वारी भक्तातर्फे गणेशयाग हवन केला जाईल. दुपारी १ वाजता आरती व महा तीर्थप्रसाद होणार आहे.

दि. ८ रोजी गिरनार वारी भक्त – गोवा व मालाड मुंबई या दोघा सांप्रदायिकां मधून महादत्तयाग संपन्न होणार आहे. सकाळी ८ वाजता गंगा आगमन, ८.३० वाजता महाराजांचे स्टेजवर पालखीतून आगमन व स्थापना, ९ वाजता आराध्य दैवत श्री गणेश पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात , दुपारी १२ वाजता भिक्षांदेही व आरती, १२.२० वाजता अग्नी प्रकट , १२.३० वाजता यज्ञहवनाला सुरुवात, संध्याकाळी ७ वाजता महाराजांच्या स्तोत्र पठण व आरती तर नंतर महाप्रसाद त्यानंतर रात्री मधूर संगीताचा कार्यक्रम होणार आहे. रविवार दि. ९ रोजी सकाळी ८ वाजता गवळण काला होणार त्यानंतर महाराजांचे पालखीतून वाजत गाजत मंत्राच्या घोषात मंदिर प्रवेश , दुपारी १ वाजता मंदिरामध्ये आरती होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे. तरी आपण सर्व दत्तभक्त आणि भाविकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे गिरनार वारी भक्तां समितीतर्फे प्रसिद्ध करण्यात आले आहे.

शिवली : महिला स्नेहमेळाव्यात उपस्थित सारिका शिरोडकर व महिला.

शिवोलीत महिला स्नेहमेळावा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. ४ : सामाजिक कार्यकर्ता कपिल किशोर कोरगावकर यांच्या पुढाकाराने आयोजित महिला स्नेह मेळावा थाटात झाला. येथील मलिंगन देवस्थानमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला सारिका शिरोडकर यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. सुषमा बाणवलीकर, रेषा नागवेकर, लतिषा रेवडकर, माया साळगावकर, काजल नागवेकर, ज्योती नागवेकर, उमा कोरगावकर, सारा कोरगावकर व इतर महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ख्रिस गेल पुन्हा क्रिकेट मैदानात परतणार

नवी दिल्ली, दि. ४ : क्रिकेट जगतातील पहिला टी२० सामना २००४ मध्ये खेळला गेला. तर, पहिला टी२० आंतरराष्ट्रीय सामना फेब्रुवारी २००५ मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात खेळला गेला होता. २००७ च्या टी२० विश्वचषकानंतर या खेळाची लोकप्रियता वाढली. तसेच सध्या, असंख्य लीग स्पर्धा टी२० स्वरुपात खेळल्या जात आहेत. आता लवकरच इंटरनॅशनल मास्टर्स लीगचे नावही यात समाविष्ट होणार आहे. ज्याचा पहिला हंगाम येत्या २२ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. या मेगा इव्हेंटमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटला निरोप दिलेले खेळाडू त्यांचा खेळ दाखवताना दिसतील. यामध्ये युवराज सिंग, सचिन तेंडुलकर, जेपी ड्युमिनी आणि श्रीलंकेचा उपुल थरंगा यासारख्या खेळाडूंची नावे आहेत. दरम्यान आता एक मोठी बातमी समोर येत आहे की, वेस्ट इंडिजचा माजी महान फलंदाज ख्रिस गेल देखील या स्पर्धेत भाग घेणार आहे. त्याच्याशिवाय, दक्षिण आफ्रिकेचा माजी वेगवान गोलंदाज मखाया एन्टिनी आणि इंग्लंडचा माजी फिरकी गोलंदाज मोंटी पानेसर हेही खेळताना दिसणार आहेत. गेल वेस्ट इंडिज मास्टर्सचे प्रतिनिधित्व करताना दिसेल. तर अँटिनी आणि पनेसर आपापल्या देशांचे प्रतिनिधित्व करतील. स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये परतण्याबद्दलचा उत्साह शेअर करताना गेल म्हणाला, मैदानावर परत येणे आणि चाहत्यांचे मनोरंजन करणे नेहमीच रोमांचक असते. आयएमएल हे त्या मोठ्या क्षणांना पुन्हा अनुभवण्यासाठी आणि खेळातील काही सर्वोत्तम खेळाडूंसोबत स्टेज शेअर करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. मी खेळाडूंची ऊर्जा आणण्यास उत्सुक आहे. या लीगसाठी मी तयार आहे. ख्रिस गेलला टी२० क्रिकेटमधील सर्वात धोकादायक फलंदाज मानले जाते. या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा काढण्याच्या बाबतीत तो अव्वल स्थानावर आहे. गेलने आतापर्यंत या फॉरमॅटमध्ये ४६३ सामने खेळले आहेत. ज्यामध्ये त्याने ३६.२२ च्या सरासरीने १४५६२ धावा केल्या आहेत. या दरम्यान त्याने २२ शतके आणि ८८ अर्धशतके ठोकल्या आहेत.

भारत-पाकिस्तान सामना दुबईमध्ये रंगणार

सामन्याची तिकिटे काही मिनिटांतच संपली | हायब्रिड मॉडेलमध्ये होणार सामना

नवी दिल्ली, दि. ४ :

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याची तिकिटे काही मिनिटांतच संपली. हायब्रिड मॉडेलमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना २३रोजी दुबईमध्ये खेळला जाणार आहे.

मिळाल्या वृत्तानुसार, या हाय-व्होल्टेज सामन्याची तिकिट विक्री सोमवारी संध्याकाळी ५.३० वाजता सुरू झाली. तिकिटाची सर्वात कमी किंमत १२५ दिरहम म्हणजेच भारतीय चलनात २९६४ रुपये होती. प्रीमियम लाउंजची किंमत ५००० दिरहम होती, जी भारतीय चलनात १ लाख १८ हजार रुपयांच्या समतुल्य आहे.

ज्या वेगाने तिकिटे विकली जात होती ती धक्कादायक होती: तिकीट खरेदी करणारी सुधाश्री

वृत्तसंस्था आयएएनएसनुसार, दुबईतील रहिवासी सुधाश्री म्हणाल्या, मला माहित होते की मला तिकिटांसाठी वाट पहावी लागेल, परंतु ज्या वेगाने तिकिटे विकली जात होती ती धक्कादायक होती. मी तिकीट काढायला गेले, तेव्हा फक्त २ कॅटेगरी उरल्या होत्या. जे माझ्या बजेटबाहेर होते.

पाकिस्तान संघ या स्पर्धेचा गतविजेता आहे. २०१७ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताने अंतिम सामन्यात पाकिस्तानला हरवून विजेतेपद पटकावले. या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, बांगलादेश आणि न्यूझीलंड या संघांचा समावेश आहे. तर ग्रुप बी मध्ये ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड आणि अफगाणिस्तान यांचा समावेश आहे.

गटातील सर्व संघ ३-३ लीग सामने खेळतील आणि टॉप-४ संघ उपांत्य फेरीत पोहोचतील. जर भारतीय संघ उपांत्य फेरी किंवा अंतिम फेरीत पोहोचला तर सामने दुबईमध्ये होतील. भारत-पाकिस्तान सामन्यापूर्वी, भारताचा सामना बांगलादेशशीही होईल, जो २० फेब्रुवारी रोजी खेळला जाईल. पण त्याची तिकिटे आयसीसीच्या वेबसाइटवरही बुक करण्यात आली आहेत. २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध खेळला जाणारा सामन्याचे तिकीटही पूर्णपणे संपले आहे.

२०२५ ची चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा यापूर्वी पाकिस्तानमध्ये होणार होती, परंतु भारतीय संघाने पाकिस्तानमध्ये जाऊन खेळण्यास नकार दिला. त्यानंतर ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलमध्ये खेळवली जात आहे. भारताचे सर्व सामने दुबईमध्ये खेळवले जातील. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये प्रेक्षकांसाठी २५,००० आसन क्षमता आहे.

रवींद्र जडेजाचे एकदिवसीय मालिकेत पुनरागमन

नवी दिल्ली, दि. ४ :

भारत आणि इंग्लंडमधील टी २० मालिकेनंतर आता एकदिवसीय मालिका खेळवली जाईल. या मालिकेत भारतीय संघाचे स्टार खेळाडू रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा खेळताना दिसतील. एकदिवसीय मालिकेत तीन सामने खेळले जातील. अशा परिस्थितीत भारतीय संघाला चॅम्पियन्स ट्रॉफीची तयारी करण्याची चांगली संधी आहे. कर्णधार रोहित आणि संघ व्यवस्थापनाला या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी योग्य संघ संयोजन शोधायचे आहे. रवींद्र जडेजाला एकदिवसीय मालिकेतच दोन मोठे विक्रम करण्याची संधी आहे.

रवींद्र जडेजाने आतापर्यंत भारतीय संघासाठी १९७ एकदिवसीय सामन्यांमध्ये एकूण २२० विकेट्स घेतल्या आहेत. ज्यामध्ये त्याने दोनदा फाईव्ह विकेट्स हॉल घेतल्या आहेत. आता जर त्याने एकदिवसीय मालिकेत आणखी दोन विकेट्स घेतल्या तर तो सर्वाधिक एकदिवसीय विकेट्स घेण्याच्या बाबतीत टिम साउथीला मागे टाकेल. साउथीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये एकूण २२१ विकेट्स घेतल्या आहेत.

दुसरीकडे, रवींद्र जडेजाने आतापर्यंत भारतीय संघासाठी एकदिवसीय क्रिकेटमध्ये एकूण १९७ सामने खेळले आहेत. आता जर त्याला इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील प्रत्येक सामन्याच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट केले तर तो भारतासाठी २०० एकदिवसीय सामने खेळण्याचा विक्रम करेल. तो भारतासाठी २०० किंवा त्याहून अधिक एकदिवसीय सामने खेळणारा १५वा खेळाडू ठरेल. सचिन तेंडुलकरने भारतीय संघासाठी सर्वाधिक ४६३ एकदिवसीय सामने खेळले आहेत.

रवींद्र जडेजाने २००९ मध्ये भारतीय संघासाठी एकदिवसीय पदार्पण केले. यानंतर, त्याने आपल्या दमदार कामगिरीने संघात कायमचे स्थान मिळवले. तो २०१३ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या भारतीय संघाचा सदस्य होता. त्याने आतापर्यंत १९% एकदिवसीय सामन्यांमध्ये २७५६ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये १३ अर्धशतकांचा समावेश आहे. याशिवाय त्याने २२० एकदिवसीय विकेट्सही घेतल्या आहेत.

सूर्यकुमारही रणजी ट्रॉफीमध्ये खेळणार

मुंबई, दि. ४ : भारतीय टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव २०२४-२५च्या रणजी ट्रॉफीच्या क्वार्टर फायनल सामन्यात मुंबईकडून खेळेल. त्याच्याशिवाय शिवम दुबेदेखील खेळताना दिसतील. दोन्ही खेळाडूंना उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यासाठी मुंबईच्या १८ सदस्यीय संघात समाविष्ट करण्यात आले आहे. दोघांनीही या स्पर्धेच्या हंगामात प्रत्येकी एक सामना खेळला आहे.

४२ वेळा चॅम्पियन राहिलेल्या मुंबईचा सामना उपांत्यपूर्व फेरीत हरियाणाशी होईल. हा सामना ८ फेब्रुवारीपासून चौधरी बन्सीलाल क्रिकेट स्टेडियम, लाहली येथे खेळला जाईल. दरम्यान, रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल आणि ऋषभ पंत यांनीही या हंगामात रणजी ट्रॉफी खेळली.

मेघालयला एक डाव आणि ४५६ धावांनी पराभूत करून मुंबईने रणजी ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. मुंबईसह अ गटातून जम्मू आणि काश्मीर हा बाद फेरीत पोहोचणारा दुसरा संघ आहे. ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्राविरुद्धच्या रणजी ट्रॉफीच्या पहिल्या टप्प्यातील सामन्यात सूर्या संघाचा भाग होता.

गुरू शिष्य नाते हे अंतिम सत्य : सुभाष शिरोडकर

डॉ. प्रदीप बोरकर यांना स्वर संवादिनी पुरस्कार प्रदान

■ टीम दैनिक हेराल्ड

बोरी, दि. ४ : कला व सांस्कृतिक संचालनालयाच्या सहकार्याने श्री नवदुर्गा संस्थान व सम्राट क्लब बोरीतर्फे आयोजित पहिला स्व. शशिकांत उर्फ विनायक रामचंद्र देवारी स्मरणार्थ नाट्य महोत्सवाचे उद्घाटन सहकार मंत्री सुभाष शिरोडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर खास निमंत्रित दीपक नार्वेकर, श्री नवदुर्गा संस्थान अध्यक्ष शाम प्रभुदेसाई, स्वागताध्यक्ष सुंदर प्रभुदेसाई, सम्राट क्लब बोरी अध्यक्ष संतोष नाईक, कार्यक्रम अधिकारी मिलिंद देवारी उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री सुभाष शिरोडकर यांनी गुरू व शिष्य या नात्यातील अनुभव सांगुन आपले प्रेम व्यक्त करत कार्यक्रम संबोधित केला. शिष्य आयुष्यात कितीही भरकटला किंवा उच्च पदावर पोचला. तरी तो आपल्या आवडत्या गुरुला विसरत नाही, त्यांचे नाते चिरंतर राहते. स्व. शशिकांत देवारी यांनी अनेक कलाकार घडवले, त्यांच्या शिष्यांनी त्यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या महोत्सवारे केलेली श्रद्धांजली अप्रतिम असल्याचे सांगून आयोजकांची स्तुती केली खास निमंत्रित दीपक नार्वेकर यांनी आयोजक व पुरस्कृत दात्यांच्या सहकार्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमाना चालना मिळते. सम्राट क्लबाच्या सांस्कृतिक संवर्धन चळवळीत सम्राट क्लब बोरी चे योगदानाबद्दल त्यांनी अभिनंदन केले. समई प्रज्वलित करून व स्व. देवारी यांच्या तसबिरीला पुष्पहार अर्पण करून नाट्य महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले पाहुण्यांना सुप्रिया पैदरकर शारदा खोलकर सिमला बोरकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले अध्यक्ष संतोष नाईक यांनी प्रास्ताविक केले व संपूर्ण महोत्सवाची माहिती दिली.

बोरी : स्वर संवादिनी पुरस्कार विजेते डॉ. प्रदीप बोरकर यांचा सत्कार करताना मंत्री सुभाष शिरोडकर. बाजूला दीपक नार्वेकर, शाम प्रभुदेसाई, सुंदर प्रभुदेसाई, संतोष नाईक व मिलिंद देवारी.

यावेळी स्व. देवारी यांच्या स्मरणार्थ पहिला स्वर संवादिनी पुरस्कार डॉ. प्रदीप बोरकर यांना सहकार मंत्री सुभाष शिरोडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला तर नाट्य कलाकार दिलिप च्यारी व गोपाळ ऊर्फ बाबल दुर्गाराम भट बोरकर यांचा श्रीफळ, शाल स्मृतिचिन्ह प्रदान करुन सत्कार करण्यात आला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. प्रदीप बोरकर यांनी स्व.देवारी यांच्या बरोबरच्या बालपणीच्या व नंतर नाटकातील आठवणी सांगुन स्वर संवादिनी पुरस्कार मिळाल्या बद्दल आनंद व्यक्त केला. नंतर लाडेवाडा मडकई येथील विमलानंद प्रस्तुत व दिग्दर्शक संदीप फडते यांचे पौराणिक संगीत नाटक गुरुदक्षिणा सादर करण्यात आले संपूर्ण नाटकात युवती व महिलांनी नाटक सादर केले प्रदिप शिलकर शैलेश गावकर यांनी संगिताची साथ दिली. यावेळी निर्मात्ता आणि दिग्दर्शक संदीप फडते यांचा खास गौरव करण्यात आला. सदर प्रयोगास नाट्य रसिकांनी भरपूर प्रमाणात ऊपस्थीत राहुन कलाकारांना प्रोत्साहन दिले. दुसरे नाटक गोव्यातील एक ऊत्तकृष्ट नाट्य कलाकार भालचंद्र ऊजगांवकर निर्मित दिग्दर्शित व अभिनेता यांचे नटसम्राट नाटकाला प्रेक्षकांनी भरभरुन प्रतिसाद दिला, त्यांचा खास सत्कार श्री नवदुर्गा संस्थान अध्यक्ष शाम प्रभुदेसाई व सरपंच जयेश नाईक यांनी केला, सदर नाट्य महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात आभार प्रदर्शन सम्राट क्लब बोरी अध्यक्ष संतोष नाईक यांनी केले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव द्यावा

भगीरथ शेट्ये : सिद्धार्थ बांदोडकर उच्च माध्यमिक विद्यालयात 'केरसुणी तयार करणे' उपक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ५ : चाकोरीबद्ध पुस्तकी शिक्षणाच्या चौकटीत न राहता कौशल्याला वाव देणाऱ्या स्वाध्यायी उपक्रमाद्वारे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील प्रतिभाशक्ती जागवून त्यांच्या सर्जनशीलतेला वाव दिला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न तसेच स्वयंपूर्ण गोव्याचा ध्यास घेतलेल्या मुख्यमंत्री तथा शिक्षणमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या दृष्टीतील सर्वांगीण विकास साधलेला गोमंतक खऱ्या अर्थाने साकारला जाईल, असे उद्गार गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांनी काढले.

वेळगे येथील बाळकृष्ण बांदोडकर संस्था संचालित सिद्धार्थ बांदोडकर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वाणिज्य शाखेच्या नम्रेश नार्वेकर, क्रीश पेडणेकर, वंश गावडे, पियुष नार्वेकर, सुजीत कुमार, अभिषेक गावडे, अश्वेक गावडे, यशवंत होंडकर, तेजस सुतार, रविश गावकर या मुलांनी 'व्यवसाय अभ्यास' विषयाअंतर्गत' केरसुणी तयार करणे' हा स्वाध्याय उपक्रम प्रा. लक्ष्मण गावस यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या राबवला. वरील उपक्रमाची माहिती व सादरीकरण गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर करण्यात आले. हा उपक्रम कसा सुचला या संदर्भात प्रा. लक्ष्मण गावस यांना विचारले असता त्यांनी आपल्या लहानपणी एकेकाळी उर्जितावस्थेत असलेला हा पारंपरिक व्यवसाय आता मात्र अखेरच्या घटका मोजत आहे. तसेच गावागावात माडांच्या चुडतापासून त्यांचे हीर काढून पारंपरिक केरसुणी किंवा सारन (झाडू) तयार करणारे हरहुन्नरी कारागीर किमान चार-पाच तरी असायचे, आज त्यांना शोधावे लागते हे सांगून आज ही पारंपरिक केरसुणी/सारन करण्याची कला लुप्तप्राय होण्याच्या मार्गावर आहे. अशी स्थिती असताना विद्यार्थ्यांना स्वयंपूर्णतेचे धडे देण्यासाठी तसेच आत्मनिर्भर होण्यासाठी पारंपरिक केरसुणी त्यांच्याकडून तयार करून घ्यावी असा विचार मनात आला असे सांगितले.

साखळी : 'पारंपरिक केरसुणी' गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांना देताना सिद्धार्थ बांदोडकर उच्च माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी. सोबत प्रा. सबरेनिंसा शेख, प्रा. लक्ष्मण गावस व इतर.

वरील विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी सिद्धार्थ बांदोडकर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रा. लक्ष्मण गावस यांच्या मार्गदर्शनाखाली हीराची केरसुणी करण्याचा अभिनव स्वाध्याय उपक्रम हाती घेतला. सत्तरी-वांते परिसरातील पारंपरिक हिराची केरसुणी अतिशय कुशलपणे तयार करणाऱ्या सुरेश गावंकर यांना गुरुस्थानी मानून गुरुकुल पद्धतीनुसार त्यांच्या घरी जाऊन दररोज तीन तास याप्रमाणे आठवडाभर काम करून पारंपरिक हिराची केरसुणी कौशल्यपूर्णरितीने कशी तयार करायची याचे शिक्षण मुलानी त्यांच्याकडून घेतले.आजची युवाशक्ती इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या आहारी जाऊन आपली सर्जनशीलता गमावून बसलेली आहे हा समज या मुलांनी खोटा ठरवत स्वकष्टाने अशा केरसुण्या तयार करून आपल्या विद्यालयातील वर्गखोल्यांची स्वच्छता करण्यासाठी स्वाध्याय उपक्रमाचा भाग म्हणून विनामूल्य आपल्या विद्यालयाला दिल्या. या सर्व विद्यार्थ्यांना घेऊन प्रा. लक्ष्मण गावस गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी गेले असताना सिद्धार्थ बांदोडकर उच्च माध्यमिक विद्यालय, वेळगे येथील या विद्यार्थ्यांनी स्वनिर्मित तयार केलेल्या या पारंपरिक केरसुण्या स्वकष्टार्जित भेट या नात्याने माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ गोवाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांना सुपूर्द केल्या. यावेळी प्रा. लक्ष्मण गावस व विद्यार्थी यांच्याया अभिनव स्वाध्याय उपक्रमाचे कौतुक करून राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने संपूर्ण गोव्यातील नववी ते बारावी इयत्तेतील विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे विविध उपक्रम संबंधित शिक्षकांच्या सहाय्याने राबवून आपल्या सर्जनशीलतेला वाव द्यावा असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष श्री भगीरथ शेट्ये यांनी केले.वरील स्वाध्याय उपक्रम 'स्वयंपूर्ण गोवा' या संकल्पनेखाली विद्यार्थ्यांच्याद्वारे यशस्वीपणे राबवून युवाशक्तीला विधायक वळण देता येते याचा अभिनव धडा घालून दिल्याबद्दल प्राध्यापक लक्ष्मण गावस यांचे संस्थेचे अध्यक्ष यतीन काकोडकर,सचिव बाबूसो गावकर, व्यवस्थापक सुबिमल दास तसेच प्राचार्य उदय मांद्रेकर,परिसरातील पालकजन, ग्रामस्थांकडून कौतुक केले जात आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १५३ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 153 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .